दिनांक २१/०७/२०२० रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आदेशाने " **BEST DETECTION OF THE MONTH** " **माहे मे २०२०** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ मे — २०२०

| | | |
|---|---|---|
| ०१ | गुन्हे प्रकटीकरण शाखा<br>कक्ष—६ | गु.प्र.शा., गु.र.क्र. ९९/२०२०, (शिवाजीनगर पोलीस ठाणे गु.र.क्र. २४२/२०२०) कलम ४२०, ३४ भा.दं.वि.सं. सह कलम सह कलम ४, २०, २५ भारतीय टेलिग्राफ अॅक्ट सह कलम ३,६ इंडियन वायरलेस टेलिग्राफी अॅक्ट |

### —: ' अनधिकृत टेलिकॉम एक्सचेंज चालवुन आर्थिक फसवणुक ':—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयातील आरोपीने त्याच्या साथीदारांच्या सहायाने, परदेशातुन येणारे आंतरराष्ट्रीय VoIP Calls हे अनधिकृतपणे सिमबॉक्स कार्यप्रणालीद्वारे एअरटेल कंपनीच्या दोन भारतीय मोबाईल क्रमांकावरून भारतातील वेगवेगळया ठिकाणावरील फोन क्रमांकावर अनधिकृतरित्या पाठवुन संमातर टेलिकॉम ऑपरेशन चालविली व शासनाची तसेच एअरटेल मोबाईल कंपनीची आर्थिक फसवणूक केली. म्हणून श्री योगेश श्रीकृष्ण राजापूरकर, वय ४३ वर्षे, (नोडल ऑफिसर— एअरटेल),यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री योगेश श्रीकृष्ण राजापूरकर, वय ४३ वर्षे, |
| गुन्हयाचा उद्देश | :— | अनधिकृतरित्या बेकायदेशीर टेलिफोन एक्सचेंज चालवून भारत सरकार व एअरटेल मोबाईल कंपनी व इतर कंपन्यांचा महसूल बुडविणे व फसवणूक करणे. |
| गुन्हयातील हस्तगत मालमत्ता | :— | (१) ३२ सिम स्लॉट असलेले ३ सिमबॉक्स तसेच १६ सिम स्लॉट असलेला १ सिमबॉक्स असे एकुण ४ कार्यरत सिमबॉक्स व त्यामध्ये एकुण ९२ सीमकार्डस<br>(२) ३२ सिम स्लॉट असलेला बंदस्थितीतील एक सिमबॉक्स<br>(३) याव्यतिरिक्त वेगवेगळया कंपनीचे अतिरिक्त १२१ सीमकार्डस<br>(४) एक WIPRO कंपनीचा काळया रंगाचा लॅपटॉप<br>(५) दोन काळया रंगाचे डी लिंक कंपनीचे दोन राउटर.<br>(६) अनुक्रमे ७ सॉकेट व ३ सॉकेट असलेले दोन लाकडी एक्सटेंशन<br>(७) वेगवेगळया कंपनीचे १० मोबाईल फोन इत्यादी |
| आरोपी अटक व दिनांक | :— | समीर कादर अलवारी, ३८ वर्षे,<br>दिनांक ३०/०५/२०२० |

**तपास कौशल्य** :— साधारण मे—२०२० मध्ये मुंबई गुन्हे शाखेस मिलीटरी इंटेलिजन्स (M.I.), जे अॅण्ड के युनिट कडुन परदेशातुन येणारे आंतरराष्ट्रीय VoIP Calls हे अनधिकृतपणे सिमबॉक्स कार्यप्रणालीद्वारे एअरटेल कंपनीच्या दोन भारतीय मोबाईल क्रमांकावरून भारतातील वेगवेगळया ठिकाणावरील फोन क्रमांकावर अनधिकृतरित्या पाठवुन संमातर टेलिकॉम ऑपरेशन चालवित असल्याबाबत व त्याद्वारे देशविरोधी कारवाया घडवुन आणण्याची शक्यता असल्याबाबत गोपनीय माहिती प्राप्त झाली. परदेशातील व्यक्तीचा आलेला कॉल भारतामध्येच असलेल्या

भारतीय मोबाईल क्रमांकावरून आल्याने यामध्ये गुन्हेगारी स्वरूपाचे देश विघातक कृत्य असलेबाबत दाट संशय आल्याने सदरबाबत मा. वरिष्ठांनी गोपनीय चौकशी करून कारवाई करण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार, सदर गोपनीय माहितीची शहानिशा करून कारवाईकामी मा. सह पोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई यांचे नियंत्रण व मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेतील कक्ष—६ व ११ मधील अधिकाऱ्यांची पथके तयार करून सर्व बाबींची पडताळणी करण्यास सुरूवात केली. गोपनीय माहितीद्वारे प्राप्त झालेल्या सदर दोन्ही मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण केले असता, त्यामध्ये दोन्ही मोबाईल क्रमांक हे प्रिपेड कार्ड असुन मध्यप्रदेश व छत्तीसगड या सर्कलचे ॲक्टीवेशन असल्याबाबत मिळून आले. दोन्ही मोबाईल क्रमांकाचे कॉल पॅटर्न तपासले असता त्यामध्ये सर्वाधिक Outgoing Calls o Incoming SMS असल्याचे आढळुन आले. तसेच दोन्ही कॉल्सच्या टॉवरमध्ये देखील बदल होत नसुन तो मुंबई सर्कल मधील नटवर पारेख कम्पाऊंड, इंडियन ऑईल नगर, गोवंडी, मुंबई या परिसरातील सेलसाईट वरून सर्व कॉल होत असल्याचे आढळुन आले. त्याचप्रमाणे नमुद मोबाईल क्रमांकाचे कॉल्स्‌ची संख्या नेहमीचे सर्वसाधारणे संख्येपेक्षा अधिक असुन दोन्ही मोबाईल क्रमांकाचे आय.एम.ई.आय. क्रमांक सुध्दा असाधारणपण (abnormal) बदलत असल्याचे दिसुन आले. एकंदरीत कॉल पॅटर्ननुसार गोवंडी, मुंबई या परिसरात अनधिकृतपणे संमातर टेलीकॉम ऑपरेशन चालवुन भारताबाहेरील आंतरराष्ट्रीय कॉल SIMBOX चे मार्फतीने अवैद्यरित्या मुंबई व भारतातील इतर ठिकाणी जनरेट करून एअरटेल व इतर मोबाईल कंपन्याचे व भारत सरकारचे आर्थिक नुकसान करीत असल्याचे आढळुन आले.

नमुद प्रकरणी मोबाईल क्रमांकाच्या विश्लेषणातुन अनधिकृतरित्या SIMBOX चालवित असलेल्या ठिकाणाची निश्चिती करून कारवाईकरीता दिनांक ३०/०५/२०२० रोजी एअरटेल कंपनीचे नोडल अधिकारी गुन्हे प्रकटीकरण ाखा कक्ष—६,मुंबई येथे हजर झाले. गुन्हे शाखेतील प्र.पो.नि. दिपक चव्हाण/कक्ष—६ यांच्या नेतृत्वाखाली म.पो.नि. अपर्णा जोशी, पो.नि. चंद्रकांत दळवी, स.पो.नि शरद झिने, स.पो.नि. विठ्ठल चौगुले, स.पो.नि. महेंद्र घाग व अंमलदार असे खाजगी टेक्नीकल एक्सपर्ट सह नटवर पारेख कम्पाऊड, गोवंडी, या परिसरात आले असता, स.पो.नि. शरद झिने यांच्या गुप्त बातमीदाराने नमुद गुन्हा हा बिल्डिंग क्र. ३/अे, रूम क्र. ६०१, नटवर पारेख कम्पाऊड, गोवंडी, मुंबई या ठिकाणी होत असल्याचे सांगीतलेवरून त्या ठिकाणी रितसर छापा टाकला असता सदर ठिकाणी समीर कादर अलवारी, वय ३८ वर्षे, याचे राहते घरामध्ये ३ कप्प्याच्या लाकडी बॉक्समध्ये ५ सिमबॉक्सचे सेटअप तयार करून संमातर टेलिकॉम ऑपरेशन चालवित असल्याचे दिसुन आलयाने त्यास अटक करण्यात आले. व सीमबॉक्स व इतर साहित्य हस्तगत करण्यात आले.

**गुप्रशा,गुअवि, कक्ष—६ तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | प्रभारी पोलीस निरीक्षक | दिपक राजाराम चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | अर्पणा अनंत जोशी | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस निरीक्षक | चंद्रकांत नारायण दळवी | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | शरद आसाराम झिने, (कक्ष—११) | प्रशस्तीपत्रक |
| ५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | विठ्ठल विरप्पा चौगुले | प्रशस्तीपत्रक |
| ६ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | महेंद्र चंद्रकांत घाग | प्रशस्तीपत्रक |
| ७ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | अनिल नथुराम गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| ८ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | महेश महादेव तोरसकर | प्रशस्तीपत्रक |
| ९ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | अर्चना सुभाष कुदळे | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | पोलीस उप निरीक्षक | रामचंद्र विष्णू इंदूलकर | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पोलीस उप निरीक्षक | विवेक तुळशिराम शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ह. २८१७४ | संजय बबन गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ह. ९५७ | देवेंद्र जयसिंग राणे | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ह. ३१७२ | तुषार जिजाबा चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह. २५५६४ | मनोहर गजानन भोसले | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ह. २७५३ | नितीन बंडू सावंत | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ह. २७८७१ | प्रकाश रामराव आव्हाड | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ना. ०१—५४८ | धनंजय बाळकृष्ण शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ह.ले. २५१७५ | संजय सीताराम तोंडवळकर | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.ना.चा. ९८०७६५ | वसंत कृष्णा डाळे | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.ना.चा. ००६७४ | गणेश महादेव कदम | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.शि.चा. ०३१५२४ | गोकुळ साहेबराव जायभाये | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.शि.चा. ०७००६९ | नितीन यशवंत चौधरी | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.ह. २६२७ | रविंद्र भांबिड (कक्ष--११) | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.ह.३२८१८ | संतोष माने (कक्ष--११) | प्रशस्तीपत्रक |